# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/08/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. केळवद :– अंतर्गत १५ कि.मी. अंतरावर मौजा उमरी येथे दिनांक ०५/०८/२०२३ चे ११.४५ वा. दरम्यान यातील **मृतक नामे– गजानन गुलाबराव बल्की, वय ५० वर्ष, रा. वार्ड नं. १ उमरी** याने आपल्या राहते घरात शेती फवारणी करिता असलेली मोनो फोटोकॉस नावाची विषारी औषध प्राशन केल्याने त्याची प्रकृती खराब झाल्याने तो घरीच मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार ठाकरे ब. नं. १५४७ पोस्टे केळवद मो. क्र. ८००७४९२६५६ हे करीत आहे.

२) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत ग्रामीण रूग्णालय उमरेड येथे दिनांक ०६/०८/२०२३ चे १३.३० वा. दरम्यान **मृतक नामे– रोशन गंगाधर काकडे, वय ३० वर्ष, रा. उदासा** हा दारू पिण्याचे सवईचा असल्याने तो दररोज दारू पित होता व नौकरीवर बरोबर जात नव्हता मृतक हा घरी कोणीही हजर नसतांना दारूचे नशेत बेडरूमचा दरवाजा आतून बंद करून घराचे स्लॅबला लागलेल्या लोखंडी हुकाला नॉयलॉन रस्सीने गळफास घेवून मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गंगाधर चिंटुजी काकडे वय ६२ वर्ष रा. उदासा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा पटले मो. नं. ९४२२८१२०८० हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत वार्ड क्र. ०४ मनसर येथे दिनांक ०५/०८/२०२३ ते दिनांक ०६/०८/२०२३ चे २१/०० वा. ते ०५/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– विनोद हंसराज रामकेळकर, वय ३५ वर्ष, रा. मनसर याची होंडा शाईन मोटर सायकल क्रमांक एम. एच.–४०/बि. डब्ल्यु.–३४३८ किंमती अंदाजे ४५,०००/– रू. ही कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे अंगणातुन चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक अर्पित पसिने मो. नं. ९६६५७६२८१८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर